N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नंदुरबार **P.S.(ठाणे):** उपनगर पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0040 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/02/2023 03:01

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 27/02/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/02/2023

**Time From (वेळेपासून):** 20:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 22:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/02/2023 **Time (वेळ):** 02:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/02/2023 02:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नंदुरबार तहसिल कार्यालयाच्या प

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सचिन सुरेश जाधव

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : सुरेश जाधव

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खिलदरी,ताचांदवड जिनाि शक ,चंदवड ,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खिलदरी,ताचांदवड जिनाि शक ,चंदवड ,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9637433354

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रशांत निळकंठ देवरे | | वडील का नाम : निळकंठ देवरे | 1. हाटदरवाजा ,चांभारवाडा ताजिनंदुरबार,उपनगर पोलीस स्टेशन,नंदुरबार,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणाऱ्याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 70,000 हस्तगत केलेली रक्कम | 70,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

70,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी सचिन सुरेश जाधव, वय-37, व्यवसाय-व्यापार, रा.खिलदरी, ता.चांदवड, जि. नाशिक. मो.नं. 9637433354.

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन मी फिर्याद देतो की, माझा गौणखनिज पुरवठा करण्याचा व्यवसाय असुन सदर व्यवसायासाठी मी श्री.आतीक सदरुददीन शेख, रा.कळवण, जि.नाशिक यांच्या मालकीचा ट्रक क्रमांक एम.एच. 41/ए.यु.6969 हा दि.05.11.2020 रोजी नोटरी सौदा करारनामा करुन घेतला आहे.सदरचा ट्रक ने कायदेशिर रित्या दि.21.02.2023 रोजी वाळुची वाहतुक करीत असतांना मंडळ अधिकारी श्री.प्रशांत देवरे यांनी नंदुरबार शहरातील करण चौफुली या ठिकाणी वाळुने भरलेला ट्रक अडवुन तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे जमा करुन घेतला आहे. त्यानंतर तहसिलदार, नंदुरबार यांच्या सहीने मला दि.23.02.2023 रोजी 4,17,216/- रुपये दंडाची रक्कम का वसुल करण्यात येवु नये बाबत मला नोटीस देण्यात आली आहे.

त्यानंतर वेळोवेळी मंडळ अधिकारी प्रशांत देवरे यांना तहसिल कार्यालयात भेटुन मी वाहतुक करीत असलेली वाळु वाहतुक कायदेषिर रॉयल्टी भरुन करीत असल्याचे सांगुन माझा ट्रक सोडुन देण्याबाबत विनंती केली. तेव्हा त्यांनी तुमचा लेखी खुलासा व 1,00,000/- रुपये घेवुन या असे मला सांगीतले आहे.

आज दि.27.02.2023 रोजी मी तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे मला दिलेल्या नोटीसचा लेखी खुलासा जमा केला असुन आज मंडळ अधिकारी प्रशांत देवरे यांची तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे जावुन भेट घेणार असल्याची तक्रार नंदुरबार येथे जिजामाता हायस्कुल समोर रस्त्यालगत दिली होती.

त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री.मंजितसिंग चव्हाण यांनी सोबत आणलेले शासकीय पंच 1.श्री.सुरेंद्र बाबुलाल शिंपी, वरिष्ठ सहायक व पंच नं.2. श्री. विजय विश्वनाथ जोशी, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, धुळे यांची माझी व स्टाफची एकमेकांना ओळख करून दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी दोन्ही पंचांना मी दिलेली लेखी तक्रार वाचण्यास दिली. त्यानंतर सदर तक्रारी अर्जावर व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांवर दोन्ही पंचांनी व पोनि. चव्हाण यांनी स्वाक्षरी केली आहे. त्यानंतर पोनि.चव्हाण यांनी सुचना देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरची सविस्तर माहिती दिल्यानंतर मला व पंच नं.1 श्री. सुरेंद्र शिंपी याचेसह पाठवुन मंडळ अधिकारी प्रशांत देवरे यांची भेट घेवुन त्यांची पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर मी, पोनि.चव्हाण व पंच नं.1 शिंपी असे माझे खाजगी कार क्र. एम.एच.15/एफ.एन.2654 ने रवाना होवुन नंदुरबार तहसिल कार्यालयाजवळ पोहचलो तेथे कार्यालय आवाराच्या बाहेरच वाहन थांबवुन तेथे पोनि.चव्हाण यांनी मला व पंच नं.1 यांना व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून पायी तहसिल कार्यालय, नंदुरबार येथे मंडळ अधिकारी देवरे यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. त्यावेळी पो.नि.चव्हाण, माझे कारमध्ये थांबुन होते.

पडताळणी दरम्यान मी व पंच नं.1 असे नंदुरबार तहसिल कार्यालयात मंडळ अधिकारी देवरे यांची भेटीकरीता गेलो असता तेथे माझी तहसिल कार्यालयात जमा केलेल्या वाळुने भरलेल्या ट्रक बाबत चर्चा झाली तेव्हा त्यांनी माझेकडे 1,00,000/- रुपये लाचेची मागणी केली तेव्हा मी त्यांना माझेकडे 70,000/-रुपये आहेत असे सांगीतले तेव्हा त्यांनी 70,000/-रुपये लागलीच घेवुन येण्यास सांगुन उर्वरीत 30,000/-रुपये त्यांचे मालेगाव येथील हस्तक नाना यांचेकडेस नंतर देवुन टाक असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं 01 माझे कार जवळ परत आलो. तेथे माझे जवळ दिलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करुन आम्ही माझे कारने जिजामाता हायस्कुल समोर रस्त्यालगत उभे असलेल्या शासकीय वाहनाजवळ गेलो. तेथे आम्ही सांगीतलेल्या हकीगतीवरुन व डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझेत व देवरे यांचेत रेकॉर्ड झालेले संभाषण पोनि चव्हाण, दोन्ही पंच व आम्ही सर्वांनी ऐकल्यानंतर मंडळ अधिकारी देवरे यांनी माझेकडे 1,00,000/-रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 70,000/-रु लागलीच घेवुन येण्यास सांगीतल्याची खात्री झाली.

त्यानंतर पोनि चव्हाण यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर मी पो.नि.चव्हाण यांना माझेकडे 59,000/-रुपये असल्याचे सांगीतले तेव्हा पो.नि.चव्हाण यांनी सदर लाचेच्या रकमेत

11,000/-रुपये अचलनीय नोटा सामिल करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मी सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाचेची रक्कम 59,500/- रू. (त्यात 500/-रु. दराच्या 119 चलनी नोटा) हजर केल्या. त्यामध्ये पो.नि. चव्हाण यांनी त्यांचे कडील 10,500/-रुपयांच्या अचलनीय नोटा (500/-रु दराच्या 21 अचलनी नोटा) सामिल केल्या मी जमा केलेली सदरची रक्कम माझे व्यवसायाच्या उत्पन्न स्त्रोतातुन उपलब्ध करून दिली आहे. त्यानंतर पोनि चव्हाण यांनी सदर नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तद्नंतर पंचासमक्ष लाचेच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावून सदर रक्कम माझे पॅन्टचे उजवे खिशात ठेवण्यात आली. त्यानंतर मला डोक्यावर डाव्या हाताने हात फिरवुन लाच स्विकारल्याचा सापळा पथकास इशारा करणेबाबत व सदर इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास सापळा पथक रंगेहात पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर मी, पंच नं.1 शिंपी, पंच नं.2 जोशी व पोनि चव्हाण असे माझे कारने रवाना होवुन तहसिल कार्यालयाच्या गेट समोर थांबलो तसेच उर्वरीत सापळा पथक षासकीय वाहनाने येवुन तहसिल कार्यालयाच्या जवळपास येवुन थांबले. तेव्हा मला पोनि चव्हाण यांनी माझे कारमधुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करून मला व पंच नं.1 अशांना मंडळ अधिकारी देवरे यांची भेट घेण्यासाठी कारमधुन उतरविले. तेव्हा कारजवळच उभे राहुन मंडळ अधिकारी देवरे यांना त्यांच्या मोबाईलवर कॉल करुन मी तहसिल कार्यालयाच्या गेट समोर उभा असल्याचे सांगीतले तेव्हा मंडळ अधिकारी देवरे यांनी थोडयावेळात तेथे येतो असे सांगीतले. काही वेळात मंडळ अधिकारी देवरे हे पांढ-या रंगाच्या कार क्र.एम.एच.15/एच.सी.2344 ने येवुन कारमधुन उतरुन माझे जवळ आले. तेव्हा आमच्यात चर्चा झाली तेव्हा मंडळ अधिकारी देवरे यांनी हाताचे इशा-याने लाचेची रक्कम मागितली म्हणुन मी माझे पॅन्टचे उजवे खिषातुन अँथ्रासिन लावलेली लाचेची रक्कम 70,000/- रू. काढुन त्यांच्या समोर धरली असता, त्यांनी त्यांचे उजवे हाताने लाचेची रक्कम स्विकारून दोन्ही हातांनी मोजुन त्यांच्या हातात ठेवुन घेतले. त्यानंतर मी तेथुनच सापळा पथकास ठरल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. सदर इशारा देताच पोनि चव्हाण, पंच नं.2 व स्टाफ असे तेथे आले. तेथे माझेकडुन 70,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारलेले मंडळ अधिकारी देवरे यांना माझे व पंच नं.1 यांचे ईषा-यावरुन पोलीस निरीक्षक चव्हाण यांचे सुचनेवरुन सापळा पथकाने अटकावुन ठेवले. त्यांना पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी त्यांची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख देवुन, त्यांना त्यांचे नांव गाव विचारता, त्यांनी त्यांचे नाव प्रशांत निळकंठ देवरे वय-42, मंडळ अधिकारी, रनाळे, तहसिल कार्यालय, नंदुरबार. रा.हाट दरवाजा, चांभारवाडा, नंदुरबार असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण लाप्रवि नंदुरबार कार्यालयात आलो व तेथेच झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी प्रशांत निळकंठ देवरे वय-42, मंडळ अधिकारी, रनाळे, तहसिल कार्यालय, नंदुरबार, रा.हाट दरवाजा, चांभारवाडा, नंदुरबार यांनी माझ्याकडे माझा वाळुने भरलेला तहसिल कार्यालय नंदुरबार येथे जमा केलेला ट्रक सोडुन देण्यासाठी 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन त्यापैकी 70,000/-रुपये लाचेची रक्कम त्यांनी नंदुरबार तहसिल कार्यालयाच्या गेट समोर दि. 27.02.2023 रोजी 20.05 वाजेचे सुमारास पंच साक्षीदारा समक्ष स्विकारुन स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरुपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Narendra Bhaidas Bhadane(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Sadhak.

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

P80
पोलीस ठाणे अमलदार
रुपनगर पोलीस स्टेशन
नंदुरबार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Narendra Bhaidas Bl

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):



Scanned with CamScanner

## General Diary Details
## ठाणे दैनंदिनी तपशील

**State (राज्य):** महाराष्ट्र

**District (जिल्हा):** नंदुरबार

**P.S. (पोलीस ठाणे):** उपनगर पोलीस स्टेशन

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 018
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 28/02/2023 13:07 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** विशेष प्रवेश
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** NarendraBhaidasBhadane /पोलीस निरीक्षक
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
   यावेळी सी.सी.टी.एन.एस अंमलदार मा.सपोनि/भदाणे सो. यांच्या आदेशाने नोंद करते की, उपनगर पोस्टे गुरन. 44/2023 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनिय सण 1988 चे कलम 7 प्रमाणे हा दि.28/02/2023 रोजी 02.27 वाजता दाखल झाला असुन उपनगर पोस्टे गुरन. 40/2023 भरला गेला आहे. बाबत नोंद.
7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**
   विशेष नोंद
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

ठाणे अंमलदार
उपनगर पोलीस स्टेशन

**Report Printed on (अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 28/02/2023

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** Narendra Bhaidas Bhadane

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** Narendra Bhaidas

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):**



Scanned with CamScanner